# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी

## नगररचना विभाग

**<u>प्रस्तावना:-</u>**

विषय:- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मौजे-टेमघर येथील स.नं.१५४, १५५, १५७, १५८, मधुन जाणारा विद्यमान ९ मी.रुंद रस्ता १२ मी. करणेच्या प्रस्तावास मान्यता देणे बाबत.

संदर्भ:- बांधकाम विभागाकडील पत्र क्र.जा.क्र.भिनिशमनपा/२०५/२०२३,दि.१७/१/२०२३

मा.सौ.आस्मिता प्रभुदास नाईक,माजी नगरसेविका यांनी दि.९/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीस अनुसरुन मौजे-टेमघर येथील स.नं.१५४,१५५,१५७,१५८ मधून जाणारा अस्तित्वात असलेला ९ मी.रुंद रस्ता १२ मी.रुंद करणेकामी वैधानिक कार्यवाही करण्यांची शिफारस करण्यांत आली आहे.

मंजूर विकास योजनेमध्ये सदरचा विद्यमान रस्ता दर्शविण्यांत आलेला नसुन रस्त्याखालील जागा रहिवास वापर विभागात अंतर्भूत होत असल्याचे दिसून येत आहे.मंजूर विकास योजना सुधारित करण्यांची कार्यवाही शासन निर्देशानुसार या कामासाठी नियुक्त करण्यांत आलेल्या विकास योजना विशेष घटक कार्यालयामार्फत सुरु आहे.विकास योजना विशेष घटक कार्यालयाकडून सुधारित विकास योजना कार्यवाही अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्राचा विद्यमान जमिन वापर नकाशा सन २०२२ मध्ये तयार करण्यांत आला असून सदर नकाशामध्ये उपरोलिखित विद्यमान रस्ता दर्शविण्यांत आला आहे.त्यानुसार सदर रस्ता मौजे-टेमघर,स.नं.१५४,१५५,भिवंडी कल्याण रस्त्यापासुन सुरु होऊन स.नं.१५७,१५८ मधून प्रस्तावित ३० मी व ६० मी.रुंद रस्त्यापर्यंत जात असल्याचे दिसून येत आहे.

सदर विद्यमान रस्त्यालगत असलेल्या भूखंडापैकी चार भुखंडावर सदर रस्ता मार्ग म्हणून गृहित धरुन बांधकाम परवानगी प्रस्ताव सन २०११ ते २०२२ या कालावधी मध्ये मंजूर करण्यांत आले आहेत.त्यापैकी एका बांधकाम परवानगी प्रकरणामध्ये जोता तपासणी प्रमाणपत्र मंजूर करण्यांत आलेला असून दुसऱ्या बांधकाम परवानगी प्रकरणामध्ये इमारत वापर दाखला दि.२४/८/२०२१ रोजी मंजुर करण्यांत आला आहे.

उपरोक्त बांधकाम परवानगी प्रस्तावाखालील प्रत्येक भूखंडाचे स्वंतत्र ७/१२ उतारे असून ७/१२ उताऱ्यावर बिनशेती असल्याचे व अभिन्यासाखालील जमिन भोगवटदार वर्ग-१ खाजगी मालकीची असल्याचे दिसून येत आहे.

उपरोलिखित ९ मी.रुंद रस्ते सदर भागातील विकास व वाढणारी वस्ती यांचा विचार होऊन १२ मी.रुंद करण्यांची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे. तसेच बांधकाम विभागाने सदर परिसरातील वाढती लोकसंख्या यांचा विचार करता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० नुसार वैधानिक कार्यवाही करण्यांची विनंती संदर्भिय पत्रान्वये केली आहे.

वरील सर्व वस्तुस्थिती, सदर रस्ता मार्ग म्हणून गृहित धरुन मंजूर करण्यांत आलेले बांधकाम परवानगी प्रस्ताव यामुळे निर्माण झालेली पूर्वबांधिलकी व वाढणाऱ्या लोकसंख्येच्या प्रमाणात वाढणारी वाहतुक,कचरा व्यवस्थापन,अग्निशमन/ रुग्णवाहिका सेवा इत्यादी बाबी विचारात घेता विद्यमान

९ मी.रस्ता १२ मी. करणेचा विभागाने सादर केलेला प्रस्ताव हा विचार करण्यायोग्य असल्याचे दिसून येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी नियमातील तरतुदीनुसार नागरीकांकरीता जाहिर सुचना दि.२०/३/२०२३ रोजीच्या दै. सकाळ,सा. आज का सिध्दांत व सा.बापाचा बाप यामध्ये प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.उक्त सुचना प्रसिध्द होऊन १ महिन्याचा कालावधी झालेला आहे.सदर कालावधी मध्ये प्रस्तावित रुंदीकरणाच्या विहित रेषेबाबत कोणतीही सुचना / हरकत प्राप्त झालेली नाही. सदर रस्त्यामध्ये व प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यालयातील सुचना फलकावर जाहिर सुचना प्रसिध्द करण्यांचे सहाय्यक आयुक्त,प्रभाग समिती क्र.२ यांना दि.१६/२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यांत आले होते. त्यानुसार कार्यवाही करण्यांत आल्याचा अहवाल प्रभाग समिती कार्यालयाकडून छायाचित्रासह प्राप्त झाला आहे.

वरील प्रमाणे वैधानिक कार्यवाही पूर्ण झालेली असून प्रस्तावित रस्तारुंदी करणाबाबत कोणतीही सूचना / हरकत प्राप्त झालेली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९,चे कलम २१० नुसार रस्त्याची विहित रेषा व नियमित रेषा करण्यांचे अधिकार मा.स्थायी समितीला आहेत. त्यामुळे मौजे-टेमघर येथील स.नं.१५४,१५५, १५७,१५८, मधून जाणारा व भिवंडी कल्याण रस्त्यापासुन सरु होऊन प्रस्तावित ३० मी. व ६० मी.रुंद रस्त्यापर्यंत जाणारा विद्यमान ९ मी.रस्ता हा १२ मी.रुंद करणेकामी प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे. सद्या मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नाहीत.त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कार्यभार प्रशासक या नात्याने आयुक्त, भिनिशमनपा पाहत आहेत.विषयांकित प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यांत आला आहे.

**प्रशासकिय ठराव क्र.** ५४७ **दिनांक:-** २०**/०४/२०२३**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मौजे-टेमघर येथील स.नं.१५४, १५५, १५७, १५८, मधुन जाणारा विद्यमान ९ मी.रुंद रस्ता १२ मी. करणेच्या प्रस्तावास बांधकाम व नगररचना विभागाने केलेल्या शिफारशी प्रमाणे मा.आयुक्त,महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. सदर प्रस्तावास अनुसरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९,चे कलम २१० नुसार आवश्यक असलेली वैधानिक कार्यवाही पूर्ण करण्यांत आली असून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रस्तावित रस्तारुंदीकरणा बाबत कोणतीही सुचना / हरकत प्राप्त झालेली नाही.महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दि.६ जुन,२०२२ अन्वये व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ चे कलम ४५२ अ मधील तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी कार्यक्षेत्रातील मौजे-टेमघर येथील स.नं.१५४, १५५, १५७, १५८, मधुन जाणारा विद्यमान ९ मी.रुंद रस्ता १२ मी. करणेच्या प्रस्तावास प्रशासकिय मान्यता देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी नि.श.महानगरपालिका,भिवंडी**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मालकीचे काटई गावांमधील मलप्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन यांची देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या प्राप्त दरांना मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी महानगरपालिकेच्या मालकीचे काटई गावामधील मल:प्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन हे मार्च २०१६ रोजी बांधून पुर्ण होऊन चाचणी व परिक्षणानंतर सुरु करण्यांत आलेले आहे. काटई येथील नविन १३ द.ल.ली. क्षमतेचे व जुने १७ द.ल.ली. क्षमतेचे मल:प्रक्रिया केंद्रे अस्तित्वात असुन सद्यस्थितीत नवीन १३ द.ल.ली. क्षमतेचे मल:प्रक्रिया केंद्र कार्यान्वित आहे. तसेच अजय नगर येथील पंपींग स्टेशन कार्यान्वित आहे. सदर संपुर्ण प्रकल्प चालु स्थितीत ठेवणे करीता मनपा आस्थापनेवर सदर बाबतचे तांत्रिक ज्ञान असलेले अभियंते / कर्मचारी उपलब्ध नाहीत.

भुयारी गटार योजना टप्पा-१ चे ठेकेदार मे. ईगल इन्फ्रा कंपनी यांची कामाची मुदत संपुन चाचणी परिक्षण कालावधी देखील संपलेला आहे. सद्यस्थितीत ७ ते ८ द.ल.ली. इतक्या पाण्यावर प्रक्रिया होत असुन सदर मल:प्रक्रिया केंद्र कार्यान्वित होऊन अडीच वर्षाचा कालावधी झाल्यामुळे बऱ्याच प्रमाणात दुरुस्तीचे काम करावे लागणार आहे.

तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्याण यांचे कडुन सदरचे मल:प्रक्रिया केंद्र कार्यान्वित करणे बाबत वारंवार नोटीसद्वारे कळविले आहे. करीता काटई गांव येथील मल:प्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशनची देखभाल, निगा व दुरुस्ती करणे कामी रु. १,४१,१७,१३२/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षामधील जुनी भुयारी गटार योजनेवरील खर्च या लेखाशिर्षकामध्ये रु.१६० लक्षची तरतुद करण्यांत आलेली आहे. या तरतुदीमधून रु.६०,४२,२५१/- मात्र खर्च झालेला आहे. उर्वरीत रु.९९,९५,७४९/- मात्रची तरतुद शिल्लक आहे. त्यामुळे सदर प्रस्तावाकरीता रु.४१,२१,३८३/- मात्रची तरतुद कमी पडत आहे. सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाच्या जुनी भुयारी गटार योजनेवरील खर्च या लेखाशिर्षकाच्या तरतुदीमध्ये रु.४१,२१,३८३/- मात्रच्या रक्कमेस अधीन राहुन सदरचा प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे.

उपरोक्त कामाकरीता दै.वृत्तपत्रात तसचे महा-ई-टेंडर्स या संकेतस्थळावर प्रसिद्ध करुन (१ वर्षाकरीता) ई-निविदा मागविण्यात आली असता एकुण दोन निविदा प्राप्त झालेल्या असुन त्याचा तौलानिक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. मे. ओम इंडस्ट्रियल इंजि. सर्व्हि. | - | अंदाजपत्रकीय दरांपेक्षा ०.९५% कमी दराने |
| **२. मे. कल्पतरु** | - | **अंदाजपत्रकीय दरांपेक्षा १२.३६% कमी दराने** |

वरील प्राप्त दरांपैकी मे. कल्पतरु यांची निविदा अंदाजपत्रकीय दरांपेक्षा १२.३६% कमी दरांची म्हणजेच रु.१,२३,७२,२५४/- मात्र सर्वांत कमी दरांची प्राप्त झालेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेतील प्राप्त दर |
|---|---|---|
| १ | **भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मालकीचे काटई गावांमधील मलप्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन यांची देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या प्राप्त दरांना मान्यता मिळणे बाबत.** | रु.१,२३,७२,२५४/- |

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मालकीचे काटई गावांमधील मलप्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन यांची देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या (१ वर्षाकरीता) कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली असुन **रु. १,२३,७२,२५४/-** मात्रच्या दरांना मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** १४८ **दिनांक :** २८ / ४ / **२०२३**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मालकीचे काटई गावांमधील मलप्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन यांची देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. . एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मालकीचे काटई गावांमधील मलप्रक्रिया केंद्रे व अजय नगर येथील ड्रेनेज पंपींग स्टेशन यांची देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या **रु. १,२३,७२,२५४/-** मात्रच्या (१ वर्षाकरीता) प्राप्त दरांना मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

## भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना :-**

**विषय :- प्रभाग समिती क्रं.1 च्या कार्यक्षेत्रात चाविंद्रा, नथुनगर, तुकाराम नगर, बंदा नवाज मस्जिद, बाला कंपाउंड, पटेल कंपाउंड, गुलजारनगर व विविध ठिकाणी डांबरीकरणाने रस्ता दुरुस्त करणे.**

प्रभाग समिती क्रं.१ च्या कार्यक्षेत्रातील चाविंद्रा, नथुनगर, तुकाराम नगर, बंदा नवाज मस्जिद, बाला कंपाउंड, पटेल कंपाउंड, गुलजारनगर व विविध ठिकाणी डांबरीकरणाने रस्ता दुरुस्त करणेकामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४९,९१,०८०/-मात्रच्या प्रस्तावास मा.आयुक्त सो यांची दिनांक २३/०२/२०२३ रोजी मंजुरी प्राप्त झाली असुन उक्त कामास मा.प्रशासकीय ठराव क्रं.१२२ दिनांक १६/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु. ४९,९१,०८०/- मात्र रकमेची ई-निविदा सुचना क्र.२२५/२०२२-२३ (८८१४२४) दै. नवभारत या वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.०६/०३/२०२३ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण २ निविदा खालीलप्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

| अनु क्रं. | निविदाकारांची नावे | निविदेतील दर | निविदेतील दराची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी,उल्हासनगर. | अंदाजपत्रकीय दराने | ४९९१०७९.१९ |
| **२** | **तुषार मोहन चौधरी, भिवंडी** | **अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.५१% कमी दराने** | **४९६५६२४.६८** |

वरीलपैकी तुषार मोहन चौधरी, भिवंडी यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.५१% कमी दराची म्हणजेच रक्कम रु.४९,६५,६२५/- (अक्षरी एकोनपन्नास लाख पासष्ठ हजार सहाशे पंचवीस मात्र) च्या खर्चाची निविदा, संविदा करणेकामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.:- १४९ दिनांक :-२६/४ /२०२३

तुषार मोहन चौधरी, भिवंडी यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.५१% कमी दराने म्हणजेच रक्कम रु.४९,६५,६२५/- (अक्षरी एकोनपन्नास लाख पासष्ठ हजार सहाशे पंचवीस मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्रं.1 च्या कार्यक्षेत्रात चाविंद्रा, नथुनगर, तुकाराम नगर, बंदा नवाज मस्जिद, बाला कंपाउंड, पटेल कंपाउंड, गुलजारनगर व विविध ठिकाणी डांबरीकरणाने रस्ता दुरुस्त करणेकामी सर्वात कमी दराचे निविदाकार तुषार मोहन चौधरी, भिवंडी यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका